# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 149/2024 दिनांक :25.04.2024**

## 1)जबरी चोरी :–

**भाग्यनगर** :– दिनांक 23.04.2024 रोजी चे 19.30 ते 20.10 वा. चे दरम्यान, **सम्राटा धाब्या पासुन थोडया अंतरावर निळा ते नांदेडकडे जाणारे रोडवर नांदेड येथे**, यातील फिर्यादी व त्यांचे मित्र मोटार सायकलने येत असतांना सम्राट धाब्याचे जवळ थोडया अंतरावर मोटार सायकल उभी करून लघुशंका करण्यासाठी थांबले असता एका स्पलेंडर मोटार सायकलवर अनोळखी दोन ईसम व बजाज पल्सर 220 मोटार सायकलवर दोन अनोळखी ईसम येवुन थांबले. त्यांचे जवळील चाकुचा धाक दाखवुन फिर्यादी व फिर्यादीचे मित्रांना म्हणाले की, तुमच्याकडे पैसे, सोने, जे कांही असेल ते काढुन द्या असे म्हणुन फिर्यादीचे व त्याचे मित्राचे गळयाला चाकु लाऊन फिर्यादीचे उजव्या हाताचे बोटातील 6 ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी किंमती 36,000/–रूपये व गळयातील चांदीची साखळी साडे चार तोळा वजनाची किंमती 3,000/–रू ची, फिर्यादी व फिर्यादीचे मित्राचे खिशातील नगदी 21,000/–रू व उजव्या हाताचे बोटातील एक तोळा 10 मिलीग्रॅम वजनाची सोन्याचा यड किंमती 76,580/–रू ची असे एकुण 1,36,580/–रूपयाचा ऐवज जबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सागर देवचंद खंदारे, वय 24 वर्षे, व्यवसाय जेसीबी मालक रा. राजनगर पावडेवाडी नाका नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 176/2024 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री इंद्राळे, मो.नं. 9975754256** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**नांदेड ग्रामीण** :– दिनांक 18.04.2024 रोजी चे 01.00 ते 03.00 वा. चे दरम्यान, **शाहुनगर वाघाळा ता. जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी हे त्यांचे कुटूंबासह घरात झोपले असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयांने लोखंडी चॅनल गेटचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करून घरातील कपाटाचे कुलूप तोडुन कपाटामधील मुलीच्या घराच्या बांधकामासाठी ठेवलेले नगदी 4,00,000/–रूपये व 12 ग्रॅम सोन्याची पोत किंमती 78,700/–रूपये असा एकुण 4,78,000/–रूपयाचा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी माधव हरी राजकौर, वय 65 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त शिक्षक रा. शाहुनगर वाघाळा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 334/2024 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री महेश कोरे, मो. नं. 8888836607** हे करीत आहेत.

## 3)अवैध रेती चोरी :–

**देगलुर** :– दिनांक 19.04.2024 रोजी चे 19.00 वा. चे सुमारास, **बल्लुर फाटा ता. देगलुर जि. नांदेड येथे**, यातील नमुद तीन हायवा टिपर चालक व मालक आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकायदेशिररीत्या हायवा टिपर क्रमांक टीएस–07/युजे–0444, टीएस–07/युएम–7513, व टीएस–07/युपी–1800 चे चालकाने तीन टीपर मध्ये सात –सात ब्रास रेती एका टिपर मध्ये 35,000/–रू प्रमाणे असे तीन टिपर मध्ये एकुण 1,05,000/–रू ची लाल रेती चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी गोरखनाथ पद्मामाकर पदकोंडे, वय 34 वर्षे, व्यवसाय नौकरी मंडळ अधीकारी देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 180/2024 कलम 379, 34 भादवी सह कलम 48(7) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम 1966 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2437 पाटील, मो.क्रं. 9423440472** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**उस्माननगर** :–दिनांक 23.04.2024 रोजी चे 19.30 ते 20.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोर अंगणात मौ. धनज (बु.) ता. लोहा जि. नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून भावजयीची शेती बटावुने का करतोस या कारणावरून गजाळीने फिर्यादीचे डोक्यात, हाताचे पंजावर मारून फॅक्चर करून गंभीर दखापत केली. व थापडा बुक्याने मारहाण केली. शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी शहाजी संभाजी शिंदे, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. धनज (बु) ता. लोहा जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 68/2024 कलम 326, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1119 श्रीमंगले, मो. नं. 9511645433** हे करीत आहेत.

## 5)भारतीय हत्यार कायदा :-

**इतवारा :-**दिनांक 23.04.2024 रोजी चे 23.15 वा. चे सुमारास, **मरघाट सार्वजनिक रोडवर नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात लोखंडी धारदार तलवार बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री देवीदास बापुराव बिसाडे, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 110/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/162 सोनकांबळे, मो.क्रं. 8888806261** हे करीत आहेत.

## 6)शासकीय आदेशाचे उल्लंघन :-

**1)वजिराबाद :-**दिनांक 23.04.2024 रोजी चे 15.00 ते 22.00 वा. चे दरम्यान, **हनुमान मंदीर हनुमान टेकडी ते कलामंदीर वजिराबाद नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून हनुमान जयंतीची मिरवणुक काढुन मिरवणुक मार्गात बदल केला व डिजे लावुन ध्वनी प्रदुषण करून शासकीय आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी प्रो. पोउपनि/वशिष्ट आश्रोबा बिक्कड, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 193/2024 कलम 188, 34 भादवि सह कलम 3(1)4(1)5(4) ध्वनी प्रदुषण नियम 2000 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1884 मुपडे, मो.क्रं. 8421435353** हे करीत आहेत.

**2)हदगांव :-**दिनांक 23.04.2024 रोजी चे 17.00 ते 23.00 वा. चे दरम्यान, **हदगाव शहरात ता. हदगांव जि. नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत हनुमान जयंतीची मिरवणुक काढुन डिजे लावुन ध्वनी प्रदुषण करून शासकीय आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री जगन गणपती पवार, ने. पोस्टे हदगांव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरनं 116/2024 कलम 188, 34 भादवि सह कलम 15 पर्यावरण संरक्षण कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2938 जुडे, मो.क्रं. 7620215669** हे करीत आहेत.

## 7)जुगार :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक 24.04.2024 रोजी चे 11.50 वा. चे सुमारास, **न्यु सुपर बॅटरीज वाजेगाव येथील दुकानाचे पाठीमागे शेडमध्ये ता. जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या मधुन मॉर्निंग नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत असतांना नगदी 1100/-रू रेडमी कंपणीचा मोबाईल असा एकुण 31,100/-रू चा साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/599, मारोती शंकरराव पचलींग, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 335/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2141 मोरे, मो. नं. 8208062971** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :-

**1)कंधार :-** दिनांक 23.04.2024 रोजी चे 23.15 वा. चे सुमारास, **सुलतानपुरा कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 1,00,500/-रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने एक टाटा इंडीका कार क्रमांक एमएच-12/केएन-6079 किंमती 4,50,000/-रू ची असा एकुण 5,50,500/-रू चे मुद्येमाला सह ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री चंद्रकांत विनायक जाधव, ने .पोस्टे कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 143/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री दिनेश मुळे, मो.नं. 8600850290** हे करीत आहेत.

**2)उमरी :-** दिनांक 24.04.2024 रोजी चे 14.45 वा. चे सुमारास, **मौ. गोरठा जाणारे रेल्वे गेट जवळ ता. उमरी जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3360/-रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/69 अरविंद विठठल हैबतकर, ने .पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 145/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2354 गेडाम, मो.नं. 9421768528** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड